# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

## नोटीस

## ( पुरवणी विषय पत्रिका )

नागपूर महानगरपालिकेची बुधवार दिनांक 21/08/2019 रोजी सकाळी 11–00 वाजता श्रीमंत राजे रघोजीराव भोसले, नगरभवन, महाल येथे भरणाऱ्या सर्वसाधारण सभेकरिता मा. सदस्यांनी दिलेल्या नोटीस विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

आदेशान्वये,

नागपूर
दिनांकः– 16/08/2019

हस्ता/–

( हरीश नवलकिशोर दुबे )
निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

विषय क्रमांक 369 (नोटीस) : –
(वित्त विभाग)
(मा. श्री. सुनिल अग्रवाल)

महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर व इतर भागात झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाल्याने तेथील जनजीवन विस्कळीत झाले आहे. मोठया प्रमाणावर नागरिकांना विस्थापित करण्यात आले असून उद्‌भवलेल्या आपातकालिन स्थितीत नागपूर महानगरपालिकडुन या पूरग्रस्त/बाढग्रस्त नागरीकांच्या मदतीकरिता मुख्यमंत्री सहाय्यता निधीत रु. 20 लक्ष राशी ची मदत पाठविण्याकरिता चर्चा करुन निर्णय घेण्याकरीता नोटीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 370 (नोटीस) : –
(आस्थापना विभाग)
(मा. श्री. प्रवीण दटके)

आदेश क्र. 23/ओ ॲन्ड एम, दि. 15/05/2014 नुसार एकुण 16 व्यक्तींना वर्ग – 4 मध्ये नियुक्ती देण्यात आली. तसेच या सर्वांना आदेश क्र. 61/ओ ॲन्ड एम, दि. 23/09/2015 ला ठराव क्र. 35, दि. 20/01/2015 अन्वये वर्ग–3 मध्ये त्यांच्या वर्ग–4 च्या नियुक्तीच्या दिनांकापासुन सेवाजेष्ठता देण्यात आली. तसेच यांना रोस्टर लावण्यात आलेले नाही.

- आदेश क्र. 64/ओ ॲन्ड एम, दि. 28/09/2015 नुसार एकुण 123 व्यक्तींना वर्ग – 4 मध्ये नियुक्ती देण्यांत आली.
- तसेच आदेश क्र. 64/ओ ॲन्ड एम, दि. 28/09/2015 या आदेशातील 19 कर्मचाऱ्यांना वर्ग – 3 मध्ये आदेश क्र. 220/ओ ॲन्ड एम, दि. 09/03/2017 नुसार उन्नत करण्यात आले. आणि या सर्वांना वर्ग – 4 च्या नियुक्ती दिनांकापासुन सेवाजेष्ठता देण्यात आली. तसेच त्यांना नियुक्ती देतांना रोस्टर मध्ये 19 जागा खाली होत्या. त्या पुर्णच भरण्यात आल्या.
- आदेष क्र. 64/ओ ॲन्ड एम, दि. 28/09/2015 मधील 57 कर्मचाऱ्यांना आदेश क्र. 220/ओ ॲन्ड एम, दि. 30/01/2018 नुसार वर्ग – 3 मध्ये उन्नत करून वर्ग – 3 च्या आदेशाच्या दिनांकापासुन सेवाजेष्ठता देण्यात आली. आणि रोस्टर मध्ये 81 जागा असुन जातीच्या श्रेणीनुसार 57 जागा भरण्यात आल्या.
- आदेष क्र. 64/ओ ॲन्ड एम, दि. 28/09/2015 मधील 07 कर्मचाऱ्यांना आदेश क्र. 220/ओ ॲन्ड एम, दि. 14/09/2018 नुसार वर्ग – 3 मध्ये उन्नत करून वर्ग – 3 आदेशाच्या दिनांकापासुन सेवाजेष्ठता देण्यात आली. आणि यांना सुध्दा रोस्टर लावण्यात आले. रोस्टर मध्ये 25 जागा असुन जातीच्या श्रेणीनुसार 07 जागा भरण्यात आल्या.
- सर्व कर्मचारी अनुकंपा तत्वावर लागलेले असुन प्रत्येक आदेशामध्ये तफावत का दिसुन येत आहे?
- ठराव क्र. 35, दि. 20/01/2015 या नुसार सेवाजेष्ठता का देण्यात येत नाही

करीता वरील सर्व मुद्यावर सभागृहात सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्याकरीता नोटीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 371 (नोटीस) : –
(आस्थापना विभाग)
(मा. श्री. प्रवीण दटके)

नागपूर महानगरपालिकेतील कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता (स्थापत्य) यांना उप अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देण्याकरीता नागपूर महानगरपालिकेच्या विभागीय पदोन्नती समितीने नुकतीच बैठक घेवून पदोन्नती देण्याची शिफारस करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या संदर्भात घेतलेल्या निर्णयावर सविस्तर चर्चा करून सभागृहाने निर्णय घेण्याकरीता नोटीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 372 (नोटीस) : –
(आरोग्य विभाग)
(मा. श्री. प्रफुल्ल गुडधे)

नागपूर महानगरपालिकेद्वारा घरोघरी कचरा गोळा केल्या जातो. त्यासाठी मनपाने रु. ६०/– प्रति महिनाप्रमाणे शुल्क आकारणी केल्या जात आहे. त्यासंबंधी मनपाने कोणते धोरण निश्चित केले व केव्हा केले यासंबंधी माहिती जाणुन घेणे व या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 373 (नोटीस) : –
(स्थावर विभाग)
(मा. श्री. सुनिल अग्रवाल)

समेकित क्षेत्रीय कौशल विकास, पुनर्वास एवं दिव्यांगजन सशक्तीकरण केंद्र नागपूर (Under Administative Control of Nattional Institute for Empowerment of Persons with Multiplle Disablities) Department of Empowerment of Persons with Disablilities (Divyangian), Ministry of Socical Justice & Empowerment, Govt . of India) या संस्थेने के. टी. नगर येथील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या दोन इमारतीपैकी ज्या इमारतीमध्ये प्रथम मजला व दुसरा मजल्यावरील SRA चे कार्यालय असलेले इमारतीमधील तीसऱ्या मजला ते सहाव्या मजल्यापर्यंतची इमारत अस्थायी स्वरुपात भाडयाने दिव्यांगजन यांचे शिक्षणाकरीता देणेबाबत चर्चा करुन निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील “१ (जे)” प्रमाणे नोटीस.

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

---